N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** उमेरखेड **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0597 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/12/2020 01:25 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Date From (दिनांक पासून):** 29/12/2020
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/12/2020
   **Time From (वेळेपासून):** 12:40 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/12/2020 **Time (वेळ):** 01:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 007 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/12/2020 01:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पचायत समिती जवळ उमरखेड,उमरखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** .संतोष रेवजी वानखेडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | सुकळी जहांगीर ,उमरखेड,उमेरखेड,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | सुकळी जहांगीर ,उमरखेड,उमेरखेड,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.अमोल रामराव चव्हाण | | | 1. पंचायत समिती उमरखेड ,उमरखेड , उमेरखेड,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलनं | भारतीय- रुपया | 3000रु | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

तक्रार कम्प,उमरखेड दि. 29/12/2020श्री.संतोष रेवजी वानखेडे, वय 42 वर्ष, धंदा शेती रा. सुकळी (जहांगीर) पोस्ट सुकळी जहागीर ता. उमरखेड जि.यवतमाळ मी वर नमुद पत्यावर माझे कुटंबासह राहतो. मला श्री. अमोल रामराव चव्हाण,वय 41 वर्ष, ग्रामसेवक नेमणुक पंचायत समिती कार्यालय, उमरखेड जि.यवतमाळ वर्ग-3 यांनी मी विकत घेतलेल्या प्लटचा गांव नमुना 8 व टक्स पावती माझे नावे करण्यासाठी 5,000/- रूपये स्वतःकरीता लाचेची मागणी केल्याने व मला त्यांना लाच रक्कम द्यावयाची नसल्याने मी त्याचेविरुध्द लाच मागणीची तक्रार देणेकरीता दिनांक 28/12/2020 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो,यवतमाळ येथे आलो व माझी लेखी तक्रार दिली मी दिलेली तक्रार खालील प्रमाणे आहे. प्रति मा.पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो,यवतमाळविषय :- लोकसेवकाकडुन लाचेची मागणी होत असल्याने कारवाई होणेबाबत. अर्जदार :- श्री.संतोष रेवजी वानखेडे, वय 42 वर्ष, धंदा शेती रा. सुकळी (जहागीर) पोस्ट सुकळी जहागीर ता. उमरखेड जि.यवतमाळमहोदय,वरील विषयान्वये विनंतीपुर्वक लेखी अर्ज सादर करतो की, मी पत्नी व दोन मुलासह ग्राम सुकळी (जहांगीर) येथे राहत असुन, षेती करुन कुटंबाचा उदरनिर्वाह करतो. माझे शिक्षण 02 री पर्यंत झाले असुन मला मराठी लिहता व वाचता येते.मी श्री.दिलीप ग्यानबा वानखेडे, वय 50 वर्षे, रा.सुकळी(जहांगीर) ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ यांचेकडुन गावातील 920 स्केअर फुट असलेला खुला प्लाट अंदाजे 6 महीण्यापुर्वी विकत घेतला आहे. नमुद प्लट हा श्री.दिलीप वानखडे यांचे नावावरुन माझे नावे गांव नमुना 8 अ करणे असल्याने तसेच टक्स पावती माझे नावे करणे कामी मी आमचे गावचे ग्रामसेवक श्री. अमोल चव्हाण यांना अंदाजे दहा ते पधरा दिवसा अगोदर भेटलो व त्यांना आपणा कडे अर्ज करु का असे विचारले असता त्यानी मला अर्जाची गरज नाही, तु मला केलेल्या नोटरीची झरक्स व 8000/- रूपये दे मी तुझे काम करुन देतो, असे म्हटले तेव्हा मी त्यांना म्हणालो की साहेब गांव नमुना 8 अ साठी लागणारी नियमाप्रमाणे फी भरतो, पण त्याला ऐवढे पैसे लागत नाही. यावर श्री.चव्हाण ग्रामसेवक मला म्हणाले की तु ते मला काही सागु नको तुझे कामाचे 8,000/- रूपये लागतील नाहीतर तुझे काम होणार नाही. त्यामुळे नाईलाजाने मी श्री. चव्हाण ग्रामसेवक याना 3,000/- रूपये व नोटरीची झरक्स काँपी दिली. मी तिन दिवसा अगोदर पुन्हा श्री.चव्हाण ग्रामसेवक याना भेटुन माझे कामासंबधाने विचारले असता त्यानी परत मला माझे काम करुन देणेकरीता 5,000/- रूपये लाचेची मागणी केल्याने मी त्यांना माझे जवळ पैसे नसल्याचे सांगुन तेथुन निघुन आलो. मी विकत घेतलेल्या प्लटचे गांव नमुना 8अ व टक्स पावती माझे नावे करण्यासाठी ग्रामपंचायत सुकळी (जहागीर) येथील ग्रामसेवक श्री.अमोल चव्हाण हे मला आता उर्वरीत 5,000/- रूपये लाचेची मागणी करीत आहे. माझी लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी लाच मागणीची तक्रार देत असुन ग्रामसेवक श्री.अमोल चव्हाण यांनी मला लाचेची मागणी केल्यास व लाच रक्कम स्विकारल्यास त्याचेवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी. माझी व ग्रामसेवक श्री.अमोल चव्हाण यांचेषी कोणतीही दुष्मनी नसुन देण्या-घेण्याचा उसनवारीचा कोणताच व्यवहार



Scanned with CamScanner

आमच्यामध्ये आजपर्यंत झालेला नाही.वरीलप्रमाणे लाच मागणीची तक्रार स्वहस्ताक्षरात दिली आहे.ठिकाण - यवतमाळ दिनांक - 28/12/2020 स्वा/-दिनांक 28/12/2020 रोजी वरीलप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक ज्ञानेष्वर नालट यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.यवतमाळ येथुन पंच क्र.1) मो. रियाजुददीन मो.शेख, निम्नस्तर लिपीक पंच क्र.2) श्री. सुषांत केषव वाहने, निम्नस्तर लिपीक असे दोन शासकीय पंच बोलाविले. माझे विनंतीवरुन तक्रारीची पडताळणी दिनांक 29/12/2020 रोजी करण्याचे ठरविल्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. नालट, पंच व स्टाफसह उमरखेड शहराबाहेरील यवतमाळ रोडवरील बायपास येथे आले. मी बायपास येथे जावुन पोलीस निरीक्षक श्री. नालट, पंच व स्टाफ यांची भेट घेतली. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी दोन्ही पंचाना माझी तोंडी तक्रार व लेखी तक्रार वाचण्यास देण्यात आली. माझी तोंडी तक्रार व लेखी तक्रारीतील मजकुर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचानी व पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली. पोलीस निरीक्षक ज्ञानेष्वर नालट यांनी मला सांगितले की, लोकसेवक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कामासंबधाने चर्चा करावी. यावेळी पडताळणी कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हईस रेकर्डरव्दारे सनडिस्क कंपनीचे 16 जी.बी. मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. पोलीस निरीक्षक श्री.ज्ञानेष्वर नालट यांनी व्हाईस रेकर्डर मध्ये 16 जी.बी. मेमरी कार्ड माझे व पंचासमक्ष टाकले. तसेच व्हईस रेकर्डरचे प्रात्यक्षीक सुध्दा करून दाखविण्यात आले आणि सविस्तर कार्यवाही दिनांक 29/12/2020 रोजीचे पडताळणीपुर्व पंचनामा कार्यवाही प्रमाणे करण्यात आली. सविस्तर कार्यवाही मला व पंचाना समजावुन सांगीतली. माझे विनंतीवरून माझे तक्रारीची पडताळणी आज दिनांक 29/12/2020 रोजी करण्यात येणार असल्याबाबत मला पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेष्वर नालट यानी सांगीतले. त्यानंतर आज दिनांक 29/12/2020 रोजी मी व पंच क्रमांक 1) मो. रियाजुददीन मो. शेख, पोलीस ज्ञानेष्वर नालट व पोना/किरण खेडकर असे यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बक, उमरखेड जवळ आलो. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी मला लोकसेवक श्री. चव्हाण, ग्रामसेवक यांची भेट घेणेकरीता यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बके जवळुन व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे गळयात लेसव्दारे व्यवस्थीत बांधुन लटकवुन शर्टाचे आत सुरू करून ठेवला. ती वेळ 12.40 वाजताची होती. मला व पंच क्र 1) श्री.मो.रियाजुददीन शेख यांना सुचना देऊन लोकसेवक चव्हाण, ग्रामसेवक यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती कार्यालय, उमरखेडकडे रवाना केले. मी आणि पंच क्रमांक 1) श्री.मो. रियाजुददीन शेख यांचे सह पंचायत समिती कार्यालय, उमरखेड समोरील पान टपरी येथे जावुन लोकसेवक श्री. चव्हाण, ग्रामसेवक यांची भेट घेतली व चर्चा केली. चर्चे दरम्यान चव्हाण, ग्रामसेवक यांनी मला मी विकत घेतलेल्या प्लटचा गांव नमुना 8 अ व टक्स पावती माझे नावे करण्यासाठी 3,000/- रूपये स्वतःकरीता लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. यानंतर मी व पंच क्र. 1) पोलीस निरीक्षक श्री. नालट व पोना/खेडकर हे थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी माझे जवळील व्हाईस रेकर्डर बंद केला. ती वेळ 12.50 वाजताची होती. यानंतर मी, पंच क्र. 1, पोलीस निरीक्षक श्री. नालट व पोना/खेडकर असे उमरखेड शहराबाहेरील बायपास जवळ थांबुन असलेल्या पडताळणी पथकाजवळ परत आलो. यानंतर मी सविस्तर हकीकत पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. नालट यांना सांगितली. व्हईस रेकर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट माझे मदतीने तयार करण्यात आली. त्यानंतर माझे विनंतीवरुन सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्याचे ठरले. मी सापळा कार्यवाहीकरीता लागणारी माझे जवळील 3000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध करुन दिली. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी सांगितल्यावरुन पोना/खेडकर यांनी मला व पंचाना अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन व अल्ट्राव्हालेट दिव्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले. यानंतर सदर नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन माझे फुल पन्टचे समोरील उजवे बाजुचे खिष्यात लाचेची रक्कम ठेवण्यात आली. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. श्री. चव्हाण, ग्रामसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास स्वतःचा डावा हात वारंवार डोक्यावरुन फिरवावा असा ईषारा सागीतला. यावेळी सापळा कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हईस रेकर्डरव्दारे सनडिस्क कंपनीचे 16 जी.बी.मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. पोलीस निरीक्षक श्री.ज्ञानेष्वर नालट यांनी व्हाईस रेकर्डर मध्ये 16 जी.बी. मेमरी कार्ड माझे व पंचासमक्ष टाकले. यानंतर सापळा कार्यवाही दरम्यान पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी यवतमाळ रोडवरील एम.एस.ई.बी.कार्यालय, उमरखेड येथुन व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे गळयात लेसव्दारे व्यवस्थीत बांधुन लटकवुन शर्टाचे आत सुरू करून ठेवला. ती वेळ 15.28 वाजताची होती. यानंतर मी आणि पंच क्र.1) मो.रियाजुददीन शेख यांचेसह पंचायत समिती कार्यालय, उमरखेड येथील गेट जवळील चहा कन्टीनकडे रवाना झालो. पंचायत समिती कार्यालय, उमरखेड येथील गेट जवळील चहा कन्टीन येथे सापळा लावण्यात आला. मी ग्रामसेवक श्री. चव्हाण यांची भेट घेतली व त्यांचेषी कामासंबंधाने चर्चा केली. चर्चेदरम्यान श्री. चव्हाण, ग्रामसेवक यांनी माझे जवळील 3000/-रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली. मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ईषारा केला. श्री.अमोल चव्हाण, ग्रामसेवक यांना सापळा पथकाने रंगेहात पकडले. पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी माझेजवळील व्हईस रेकर्डर ताब्यात घेऊन बंद केला. ती वेळ 15/40 वा. होती. श्री. अमोल चव्हाण, ग्रामसेवक यांचे हात, लाचेच्या नोटा व माझे हात अल्ट्राव्हईलेट दिव्यांचे प्रकाषात तपासण्यात आले. तसेच लाचेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहण्यात आले. सविस्तर कार्यवाही दिनांक 29/12/2020 रोजीचे सापळा कार्यवाही पंचनामा प्रमाणे करण्यात आली आहे.तरी आरोपी लोकसेवक अमोल रामराव चव्हाण,वय 41 वर्ष, ग्रामसेवक मुख्यालय ग्रापं बोथा 1(ग्राप सुकळी (जहा.), बोथा 1, वरुड बी.बी.) नेमणुक पंचायत समिती कार्यालय, उमरखेड जि.यवतमाळ यांनी दिनांक 29/12/2020 रोजी पडताळणी दरम्यान मी विकत घेतलेल्या प्लटचा गांव नमुना 8अ व टक्स पावती माझे नावे करण्यासाठी श्री. अमोल चव्हाण, ग्रामसेवक यांनी स्वतःकरीता 3,000/- रूपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. वरून सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक अमोल रामराव चव्हाण, ग्रामसेवक यांनी पंचासमक्ष लाच रक्कम स्विकारली. त्यावरुन आरोपी लोकसेवक अमोल रामराव चव्हाण, ग्रामसेवक नेमणुक पंचायत समिती कार्यालय, उमरखेड जि.यवतमाळ यांचेविरूध्द कायदेषीर कारवाईस्तव तक्रार देत आहे.माझी वरीलप्रमाणे तक्रार मराठीत टंकलीखीत केली असुन, मी अँटी .क.ब्युरो पथकासह पोलीस स्टेशन उमरखेड येथे येऊन तक्रार देत आहे, सदर तक्रार मला वाचुन दाखविण्यात आली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.



Scanned with CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Sanjay Bhujangrao Chobe(I (Inspector)) / POBN47823 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer In charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Sanjay Bhujangrao Chobe

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN47823



Scanned with CamScanner